# जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर

## भरती प्रक्रिया सन-२०२४

## पदाचे नाव - पुस्तक बांधणीकार

लातूर जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील "पुस्तक बांधणीकार" या पदाकरीता ०१ (एक) उमेदवाराची निवडसूची आणी ०१ (एक) उमेदवाराची प्रतिक्षासूची तयार करण्यासाठी, पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

विस्तृत/सविस्तर जाहिरात विहीत अर्जाच्या नमुन्यासह, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर यांचे अधिकृत संकेतस्थळ **https://latur.dcourts.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक १४/०९/२०२४ रोजीच्या सकाळी ११.०० वाजल्या पासून उपलब्ध राहिल. सदरचा नमुना डाउनलोड करता येईल.

पात्र उमेदवारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या नमुन्यातील अर्ज व त्यासोबत कागदपत्रांच्या स्वप्रमाणित प्रती नोंदणीकृत पोच देय डाकेने/पत्रा द्वारे म्हणजेच **RPAD** किंवा शिघ्र डाक सेवा पोच पावतीसह म्हणजेच **Speed Post** द्वारे या कार्यालयास म्हणजेच, "प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर" या पत्यावर पाठवावेत. तसेच लिफाफ्यावर "पुस्तक बांधणीकार" या पदासाठी अर्ज असे नमुद करावे. कोणत्याही परिस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे म्हणजेच "**By Hand**" अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. अपूर्ण अर्ज नामंजूर करण्यात येतील याचीही नोंद घ्यावी. तसेच मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याचीही नोंद घ्यावी. अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख २५/०९/२०२४ सायंकाळी ६:०० पर्यंत आहे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

विस्तृत जाहिरात अर्जाच्या नमुन्यासह जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर यांच्या **https://latur.dcourts.gov.in** या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जिल्हा न्यायालय, लातूर

दिनांक १३/०९/२०२४

( व्ही. व्ही. पाटील )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
लातूर.

***

जाहिरात दिनांक :— १३/०९/२०२४
जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक :— १४/०९/२०२४
अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक :— २५/०९/२०२४ **सायकाळी ०६:०० वाजेपर्यंत.**

# जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर

## पुस्तक बांधणीकार पदासाठी जाहिरात

## दुरध्वनी क्रमांक ०२३८२—२४३५४४

१. जिल्हा न्यायालय, लातूर या आस्थापनेवरील **'पुस्तक बांधणीकार'** या पदाकरिता उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच (आर.पी.ए.डी.) किंवा शीघ्र डाक सेवा (स्पीड पोस्ट) पोच पावतीसह, द्वारे **'पुस्तक बांधणीकार पदाकरिता अर्ज'** असे लिफाफ्यावर लिहून **'प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर** (या नंतर ज्यास संक्षेपाकरीता जिल्हा न्यायालय असे संदर्भित केले आहे) यांच्याकडे **दिनांक २५/०९/२०२४ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजेपर्यंत** अथवा त्यापुर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

३. **दिनांक २५/०९/२०२४** या तारखेनंतर आलेले अर्ज, त्याच प्रमाणे साध्या पोस्टाने पाठविलेले अर्ज आणि समक्ष आणून दिलेले अर्ज किंवा लिफाफ्यावर **'पुस्तक बांधणीकार पदाकरिता अर्ज'** असे नमूद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४. **पदाचे नाव :— पुस्तक बांधणीकार**
**निवड यादीसाठी पदांची संख्या : ०१**
**प्रतिक्षा यादीसाठी पदांची संख्या : ०१**

५. **पदासाठी आवश्यक पात्रता :—**
उमेदवार हा १) माध्यमीक शालांत (S.S.C.) परीक्षा उत्तीर्ण असावा.
२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा इतर तत्सम शासन मान्यता प्राप्त संस्थेमधुन पुस्तक बांधणीबाबत कोर्स उत्तीर्ण असावा.
३) उमेदवाराला पुस्तक बांधणीबाबत तांत्रिक व व्यवसायीक माहिती असणे आवश्यक आहे.

६. **वयोमर्यादा :—** या जाहिरातीच्या दिनांकाच्या दिवशी उमेदवार १८ वर्षापेक्षा कमी वयाचा नसावा, सर्वसाधारण प्रवर्गाकरिता ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा व मागासवर्गीय असल्यास ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. शासन निर्णय क्र.एसआरव्ही—१०७७/३५७६/१४३३/१६—अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार शारीरिकदृष्टया अपंग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्ये पार पाडण्याकरीता सक्षम असतील तर, त्यांच्या सेवा प्रवेशासाठी विहीत केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षा पर्यंत केलेली आहे.

७. **कामाचे स्वरुप :—** निवड झालेल्या उमेदवारास लातूर जिल्हा न्यायिक विभागांतर्गत कोणत्याही न्यायालयात पुस्तक बांधणीकार या पदावर नियुक्ती/प्रतिनियुक्ती दिली जाईल. नियुक्तीनंतर उमेदवारास न्यायालयाच्या ग्रंथालयातील पुस्तकांची बांधणी तसेच न्यायालयातील राखण्यात येणाऱ्या फाईल्स, नोंदवहया इत्यादीची बांधणी करणे इत्यादी कर्तव्य पार पाडावी लागतील. त्याच प्रमाणे अधिकारी यांचे निर्देशानुसार आवश्यक ती सर्व कामे करावी लागतील. पुस्तक बांधणीकार हे पद एकाकी असून, त्या पदास पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही, या बाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. **उमेदवारांकरिता सुचना :—**

(१) ''नोंदणी क्रमांक'' हा अर्जातील रकाना कार्यालयाद्वारे भरण्यात येईल.

(२) अर्जाचा नमुना जिल्हा न्यायालय, लातूरच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्या प्रमाणेच असावा.

(३) प्रतिक्षा यादी प्रसिध्द झाल्यापासून ती फक्त ०२ वर्षाच्या कालावधी पर्यंतच वैध राहिल.

(४) ओळखपत्र असल्याशिवाय मुल्यमापन परिक्षा व मुलाखतीस हजर राहण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(५) या कार्यालयाने सदर भरतीसाठी कोणतेही शुल्क आकारलेले नाही, ही भरती पुर्णपणे विनाशुल्क आहे, उमेदवारांनी अर्ज दाखल करते वेळी कोणत्याही प्रकारच्या शुल्कापोटी कोणतेही दर्शनी धनाकर्ष (Demand Draft), प्रदानादेश (Pay Order), धनादेश (Cheque) इत्यादी अर्जासोबत पाठवू नये, याची नोंद घ्यावी.

९. **अर्ज करण्याची पध्दत** :— जाहिरात, अर्ज व प्रमाणपत्र जिल्हा न्यायालय, लातूरचे संकेतस्थळ **https://latur.dcourts.gov.in** यावर उपलब्ध आहेत. त्या नमुन्यातच अर्ज व सोबतची प्रमाणपत्रे आणि कागदपत्रांच्या स्व:प्रमाणित प्रती अर्जासोबत सादर करावीत. कोणत्याही परिस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे म्हणजेच By Hand अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

१०. जे उमेदवार या पूर्वीच शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या—त्या विभाग/कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवूनच अर्ज करावा. अशी परवानगी मुलाखतीच्या वेळी सादर करावी. उमेदवारांनी आपले अर्ज आप आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखा मार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

११. उमेदवाराने जर निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणा मार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटण्याचा किंवा इतर गैरमार्गाचा प्रयत्न केल्यास, त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

१२. अर्जाचा नमुना व सोबतच्या प्रमाण पत्रांचे नमुने जिल्हा व सत्र न्यायालय, लातूरच्या अधिकृत संकेतस्थळ **https://latur.dcourts.gov.in** यावर उपलब्ध आहेत. त्या नमुन्यातच अर्ज सादर करावा.

१३. उमेदवाराने त्याचे/तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो) अर्जावर दिलेल्या जागी लावुन त्यावर अशा प्रकारे स्वाक्षरी करावी की, स्वाक्षरीची सुरुवात छायाचित्रावर करुन तिचा काही भाग छायाचित्राबाहेर येईल.

१४. उमेदवाराने दोन सन्माननीय व्यक्तींनी जाहिरातीच्या तारखेनंतर दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत. तसेच त्याचे विरुध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला निकाली/चालु किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणित करावे, असल्यास त्याचा तपशिल द्यावा.

१५. विहित नमुन्यात नसलेला आणि अपुर्ण माहिती असलेला तसेच लिफाफ्यावर **'पुस्तक बांधणीकार पदाकरिता अर्ज'** असे नमूद न केलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

१६. पुस्तक बांधणीकार यांच्या भरती प्रक्रियोच्या वेळी जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास योग्य ते निकष लावुन पुढील पक्रियेकरिता उमेदवारांची लघुसूची तयार करण्याचे अधिकार निवड समितीस राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहिल व अशी तयार केलेली लघुसूची जिल्हा न्यायालय, लातूर येथील सुचना फलाकावर व https://latur.dcourts.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तयार केलेल्या लघुसुचीबाबत कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

१७. अशी अल्पसुची तयार करण्याचे किंवा आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार निवड समितीने स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत.

१८. पुस्तक बांधणीकार पदासाठी उमेदावारांची २० गुणांची पुस्तक बांधणी कामाची मुल्यमापन परिक्षा घेण्यात येईल.

१९. पुस्तक बांधणी कामाचे मुल्यमापन परिक्षेतील गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची २० गुणांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

२०. उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करिता, परिक्षा व मुलाखतीस बोलविल्यास स्व:खर्चाने हजर रहावे लागेल.

२१. सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात काही कारणाने बदल झाल्यास किंवा अन्य महत्वाची सुचना असल्यास त्याची माहिती जिल्हा न्यायालय, लातूरचे सुचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परंतु तो बदल वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

२२. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

२३. अर्जासोबत **"नमुना—अ"** मधील प्रतिज्ञापत्र जोडावे. तसेच **"नमुना घोषणा"** ही जोडावी.

२४. पुस्तक बांधणीकार पदासाठी घेतलेल्या मुल्यमापन परिक्षेमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे, जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या संख्येच्या ३ (तीन) पट उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. १:३ हे गुणोत्तर राखण्यासाठी शेवटच्या उमेदवाराने मिळवलेल्या गुणांइतकेच गुण मिळवणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल.

२५. उमेदवारांची निवड ही पुस्तक बांधणीकार पदाच्या मुल्यमापन परिक्षा आणितोंडी मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे काटेकोरपणे गुणवत्तेनुसार केली जाईल.

२६. सेवाप्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक वेळोवळी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर **https://latur.dcourts.gov.in** व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

२७. लघुसूचित होण्यास पात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर तसेच सुचनाफलकावर प्रसिध्द करण्यात येतील. पुढील चाचणीकरीता बोलावण्याबातची सुचना ही जिल्हा न्यायालयाच्या सुचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाणार असल्यामुळे उमेदवारांनी **" वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे "** त्यांच्या हिताचे राहील. लघुसूची प्रसिध्द करतेवेळीच ओळखपत्राचा नमुना संकेतस्थळावर अपलोड केला जाईल याची नोंद घ्यावी.

२८. त्यांनतर ओळखपत्राचा नमुना उमेदवारांनी संकेतस्थळावरुन डाउनलोड करुन घेउन व्यवस्थित रित्या भरुन आणि त्यावर आपले नविनतम पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (अर्जासोबत पूर्वी सादर केलेले) चिकटवून आणि त्यावर दिलेल्या जागी काळया शाईने स्वाक्षरी करुन जिल्हा न्यायलयास दिलेल्या तारखांना सादर करावे आणि आपले प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे. प्रवेशपत्र असल्याशिवाय मुल्यमापन परीक्षेस व मुलाखती हजर राहण्यास परवानगी दिली जाणार नाही.

जिल्हा न्यायालय, लातूर

**( व्ही. व्ही. पाटील )**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
लातूर.

दिनांक १३/०९/२०२४

# अर्जाचा नमुना
# जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर
# पुस्तक बांधणीकार पदासाठी अर्ज

( समोरील रकान्यामध्ये योग्य ती माहिती भरावी )

| नोंदणी कमांक<br>(कार्यालयीन उपयोगा करीता) | | | | | |
|---|---|---|---|---|---|

नुकतेच काढलेला<br>पासपोर्ट आकाराचे<br>रंगीत छायाचित्र<br>(फाटो स्वाक्षरी सहित)

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपुर्ण नाव - | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता पिनकोड सह | |
| ३ | कायमस्वरुपी संपूर्ण पत्ता पिनकोड सह | |
| ४ | राष्ट्रीयत्व | |
| ५ | अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? | |
| ६ | दूरध्वनी/भ्रमणध्वनी कमांक | |
| ७ | ई-मेल आयडी ( असल्यास ) | |
| ८ | लिंग : पुरुष/स्त्री/इतर<br>( समोरील रकान्यामध्ये योग्य ती माहिती भरावी ) | |
| ९ | धर्म/जात | |
| १० | जातीचा प्रवर्ग | |
| ११ | जन्म दिनांक | |

| | | |
|---|---|---|
| १२ | जहिरातीच्या तारखेस अर्जदाराचे वय<br>(...वर्षे...महिने....दिवस समोरील रकान्यामध्ये नमुद करावेत.) | |
| १३ | उमेदवार विवाहित आहे काय? | |
| १४ | हयात असलेल्या मुलांची संख्या | |
| १५ | २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या | |
| १६ | अर्जदार न्यायालयीन कर्मचारी आहे काय? असल्यास न्यायालयाचे नाव व पदनाम | |
| १७ | न्यायसंस्थेत कार्यरत असलेल्या नातेवाईकांचा संपूर्ण तपशिल | |
| १८ | शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास कार्यालयाचे नाव व नेमणूकीची तारिख. | |
| १९ | शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास, अर्जदार योग्य मार्गाने अर्ज सादर करत आहे का ? | |
| २० | उमेदवार दिव्यांग आहे काय ?<br>( असल्यास तसा दाखला जोडावा ) | |
| २१ | पुस्तक बांधणी कामाचा अनुभव आहे/नाही. असल्यास त्याचा तपशील नमुद करावा. | |

२२. **<u>शैक्षणिक अर्हता</u>** :-

| अ. क. | शैक्षणिक अर्हता | परिक्षामंडळ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १) | दहावी | | | |
| २) | बारावी | | | |
| ३) | पदवी | | | |
| ४) | पदव्युत्तर | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५) | उमेदवाराने औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा इतर तत्सम शासन मान्यता प्राप्त संस्थेमधुन पुस्तक बांधणीबाबत कोर्स उत्तीर्ण केलेल्या प्रमाणपत्राचा तपशील | | | |

२३.

अ. उमेदवाराविरुध्द कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे का? : ---------
( असल्यास माहिती जोडावी. )

ब. त्याला/तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले आहे काय? : ---------

क. तो/ती शिस्तभंगाच्या चौकशीला सामोरे जात आहे का : ---------

२४. <u>उमेदवाराला चारित्र्याचे दाखले दिलेल्या व्यक्तींची नावे व पत्ता:</u>

१. ..............................................................
..............................................................
२. ..............................................................
..............................................................

मी याद्वारे प्रमाणित करतो / करते की, माझे माहितीप्रमाणे वरील तपशील सत्य आणि अचूक आहे. यातील कोणतीही माहिती चूक/खोटी आढळल्यास मी निवड प्रक्रियेसाठी अपात्र ठरेल आणि माझी निवड/नेमणूक झाल्यास माझी सेवा कोणतीही नोटीस न देता संपुष्ट करण्यात येईल, याची मला जाणीव आहे. तसेच दिनांक २८.०५.२००५ नंतर जन्मलेल्या मुलांची संख्या ०२ पेक्षा जास्त असल्यास मला सदर पदावरून अपात्र ठरविण्यात येईल यांची मला जाणीव आहे.

दिनांक :- /०९/२०२४

............................
उमेदवाराची स्वाक्षरी.

ठिकाण :-

............................
उमेदवाराचे नाव.

अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशील खालीलप्रमाणे :

१. ..........................................................................................

२. ..........................................................................................

३. ..........................................................................................

४. ..........................................................................................

५. ..........................................................................................

६. ..........................................................................................

७. ..........................................................................................

८. ..........................................................................................

९. ..........................................................................................

१०. ..........................................................................................

# नमुना 'अ'
## प्रतिज्ञापत्र

मी, श्री/श्रीमती/कुमारी...................................................श्री/श्रीमती ...............................................यांचा मुलगा/मुलगी/पती/पत्नी, वय..............वर्षे, राहणार.............................................., याद्वारे पुढील प्रमाणे जाहिर करतो/करते की,

१. मी, 'पुस्तक बांधणीकार' या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२. मी अर्जदार याद्वारे प्रतिज्ञापुर्वक जाहिर करतो की/करते की, मला आज दिनांक ....../०९/२०२४ रोजी ...... अपत्य आहेत, त्यापैकी ..... अपत्य दिनांक २८/०३/२००५ नंतर म्हणजेच दिनांक ....../..../........ (त्या अपत्याची जन्म दिनांक येथे नमुद करावी), रोजी जन्माला आले आहे.

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

४. मी असेही जाहीर करतो/करते की, माझेविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा माझेविरुध्द फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही झालेली नाही.

५. या जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व सूचना व अटी मला मान्य आहेत.

दिनांक :- /०९/२०२४

.............................

उमेदवाराची स्वाक्षरी.

ठिकाण :-

..............................

उमेदवाराचे नाव.

**टिप :– अर्जदार अविवाहीत असल्यास त्याने वरील प्रतिज्ञापत्रात आवश्यक त्या ठिकाणी लागू नाही असे नमुद करावे.**

<u>नमुना 'ब'</u>

चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ........................................हे/हया..........................................तालुका ............................ जिल्हा ............................. येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील ................ वर्षापासून ओळखतो. त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे.

सबब हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक : /०९/२०२४

प्रमाणपत्र देणा-याचे नाव व सही

पत्ता : ................................

..........................................

..........................................

भ्रमणध्वनी क.

# <u>घोषणा</u>

मी वर नमुद उमेदवार याद्वारे शपथपूर्वक घोषीत करतो/करते की मला शासकीय सेवेकरिता घोषीत केलेले नाही. तसेच मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्याविरुध्द कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही/फौजदारी न्यायालयामध्ये खटला प्रलंबित प्रस्तावित नाही.

मी याद्वारे शपथपूर्वक असेही घोषित करतो/करते की अर्जामध्ये नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी/चुकीची आढळल्यास माझी सेवा कोणतीही सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल याची मला जाणीव आहे. तसेच असेही शपथपुर्वक घोषित करतो की, मला यापुर्वी राज्यशासन, केंद्रशासन व अन्य शासन पुरस्कृत प्राधिकरणाच्या नोकरीतून निष्कासित अथवा काढून टाकलेले नाही.

तसेच दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्मलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा जास्त असल्यास मला सदर पदावरुन अपात्र ठरविण्यात येईल.

दिनांक :- /०९/२०२४

............................

उमेदवाराची स्वाक्षरी.

ठिकाण :-

..............................

उमेदवाराचे नाव.